15 JUN 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उज्ज्वल भविष्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी कनेक्ट व्हा

## विद्यापीठातील क्रीडा कार्यशाळेत प्रा. डॉ. देशमुख यांचे आवाहन



**शिवाजी विद्यापीठातून**




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. एम. एस. देशमुख. शेजारी डॉ. शरद बनसोडे, डॉ. टी. एन. चौगुले, डॉ. पी. टी. गायकवाड, अभिजित मस्कर, कृष्णात पाटील आदी.

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शालेय विद्यार्थ्यांनी उज्ज्वल भविष्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा अंतर्गत (एनईपी) विद्यापीठाशी कनेक्ट व्हावे. शालेय विद्यार्थ्यांनी विद्यापीठाशी कनेक्ट होऊन विविध क्षेत्रामध्ये संशोधन, शैक्षणिक, क्रीडा, कला इत्यादी क्षेत्रामध्ये उज्ज्वल भविष्य घडवावे, असे आवाहन मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले.

क्रीडा अधिविभागामार्फत एन. ई. पी. स्कूल कनेक्ट मोहिमेअंतर्गत 'शारीरिक शिक्षणातील सध्याचे प्रवाह आणि क्रीडा क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावर शिवाजी विद्यापीठातील क्रीडा विभागातर्फे विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेच्या उद्घाटन डॉ. एम. एस देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. टी. एन. चौगुले, विद्यार्थी विकास संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सुभाष पवार, मनीषा शिंदे, विजय रोकडे, विजय मळगे, प्रफुल मांगोरे - पाटील, अभिजित मस्कर, कृष्णात पाटील, जालंधर मेढे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले. त्यांनी विद्यापीठामार्फत खेळाडूंना देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा आणि होतकरू खेळाडूंना विविध आर्थिक योजना याची माहिती दिली.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात श्री अथर्व देवणावर यांनी 'स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग' या विषयावर तसेच दुसऱ्या सत्रात डॉ. सुशांत मगदूम यांनी 'खेळातील करिअरच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. किरण पाटील व सुचय खोपडे यांनी केले. कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व क्रीडा अधिविभागाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेसाठी जिल्ह्यातील विविध कोचिंग सेंटरचे मार्गदर्शक, खेळाडू व पालक उपस्थित होते.

15 JUN 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालयांचे शैक्षणिक सत्र आजपासून सुरू होणार

## कुलगुरू डी. टी. शिर्के यांनी घेतली विभागप्रमुखांची बैठक : अधिविभाग मंगळवारपासून सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे २०२४-२५ चे पदवी अभ्यासक्रमाचे प्रथम शैक्षणिक सत्र आज शनिवारपासून सुरू होणार आहे. विद्यापीठातील अधिविभागाचे शैक्षणिक सत्र मंगळवारपासून (दि.१८) सुरू होणार असून महाविद्यालयांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांचेही शैक्षणिक सत्र याच दिवशी सुरू होईल.

कला, वाणिज्य, विज्ञान, सामाजिकशास्त्रे हे पदवी, कला व ललितकला अभ्यासक्रमाचे प्रथम शैक्षणिक वर्ष आज शनिवारपासून सुरू होणार असून, २६ ऑक्टोबरला प्रथम सत्र संपेल. दरम्यान, नवीन शैक्षणिक धोरणाची स्वायत्त महाविद्यालयांनी अंमलजबजावणी सुरू केली असून विद्यापीठाशी संलग्नित काही महाविद्यालये यंदाच्या वर्षापासून या धोरणाची अंमलबजावणी करणार आहेत. दरम्यान, नवीन सत्र सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुक्रवारी विद्यापीठातील ३७ अधिविभागातील विभागप्रमुखांची आढावा बैठक घेतली. विद्यार्थ्यांच्या तक्रारी येऊ नयेत, यासाठी विभागप्रमुखांनी काळजी घ्यावी, काही अडचण असल्यास ती थेटपणे माझ्याकडे मांडावी, अशा सूचना त्यांनी विद्यापीठातील अधिविभागप्रमुखांना दिल्या.

15 JUN 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ परीक्षेला २ हजार ७४८ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला २ हजार ८०९ विद्यार्थी बसले, त्यापैकी ६१ विद्यार्थी अनुपस्थित होते.

विद्यापीठातर्फे सुरू असलेल्या उन्हाळी सत्रातील परीक्षेंतर्गत शुक्रवारी बॅचलर ऑफ फार्मसी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या.



दरम्यान, दि. १४ रोजी एलएलएम विविध सत्रांचे निकाल जाहीर करण्यात आले.

आजअखेर ६६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. भरारी पथकाकडून कोल्हापूर जिल्ह्यातून ४ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

15 JUN 2024 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या ६६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. शुक्रवारी बॅचलर ऑफ फार्मसीची परीक्षा झाली. तर शुक्रवारअखेर एकूण ६६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. बॅचलर ऑफ फार्मसीच्या परीक्षेस २८०९ विद्यार्थ्यांपैकी ६१ विद्यार्थी अनुपस्थित होते. दिवसभरात ४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. तर एकूण ६६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. विद्यापीठाने परीक्षेत गैरवर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रणासाठी भरारी पथके स्थापन केली. शुक्रवारी या पथकाकडून जिल्ह्यातून ४ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली

[illegible]
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUN 2024
सकाळ



कोल्हापूर : विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांसमवेत डॉ. एस. एन सपली, प्रा.गणेश पाटील, महेश साळुंखे, वैभव कांबळे, अनिकेत रेणावीकर.

# 'सिव्हिल अभियांत्रिकी'तील २९ विद्यार्थी बहुराष्ट्रीय कंपन्यांत

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये विविध शाखांसाठी प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले जाते. या माध्यमातून अधिविभागातील स्थापत्य (सिव्हिल) अभियांत्रिकी विभागामधून २९ विद्यार्थ्यांची नियुक्ती बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झाली आहे.

अदानी सिमेंट कंपनीने तन्मय गिहें, हर्षद केंगले, बाबासाहेब गलवे, शाम पाटील या विद्यार्थ्यांची 'टेक्निकल इंजिनिअर' या पदावर निवड केली आहे. स्कॉन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने ममता जाधव, दिव्या भगरे, साक्षी सुपाने, ऋतुराज फल्ले, हर्षीकेश वेखंडे, शिवकुमार माने यांना 'डिझाईन इंजिनिअर' या पदावर नियुक्त केले आहे. केनेस्ट मॅन्युफ्रॅक्चरर कंपनीने ओंकार कटके याची एक्सिक्युशन इंजिनिअरपदी निवड केली आहे. आर. डी. सी. कॉंक्रिट कंपनीने एस. माने याची ट्रेनी इंजिनिअर, तर टोटल टेक कंपनीने सिव्हिल विभागातून १६ विद्यार्थ्यांची प्रोजेक्ट इंजिनिअर म्हणून नेमणूक केली आहे. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली, विद्यापीठ प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल अधिकारी डॉ. राजन पडवळ, तंत्रज्ञान विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. गणेश पाटील, स्थापत्य विभागप्रमुख प्रा. महेश साळुंखे, प्लेसमेंट प्रतिनिधी प्रा. वैभव कांबळे, अनिकेत रेणावीकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

15 JUN 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : मॉन्सूनच्या पार्श्वभूमीवर निसर्गाची विविध रुपे आता अनुभवायला मिळू लागली आहेत. शिवाजी विद्यापीठ परिसरात फुललेली विविधरंगी फुले आणि आकाशातील ढगांचा खेळ हा सारा आविष्कार टिपलाय 'सकाळ'चे छायाचित्रकार नितीन जाधव यांनी.